F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे

क्रमांक :- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/डॉपंदेनिभ/२०२२-२३/ ३०७
दिनांक :- २४ / ११/२०२२

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :-डीबीटी पोर्टलद्वारे शै.वर्ष २०२०-२१ व शै.वर्ष २०२१-२२ करिता विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांतर्गत निर्वाह भत्त्याची प्रलंबित रक्कम अदा करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी भरण्यासाठी महाआयटी यांचेकडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पर्यायाबाबत....

संदर्भ : १. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. तंनिवि-१५२१/प्र.क्र.१०७/२१/तांशि-३/दि.०९/०९/२०२१.
२.या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/ शा.पत्र /२०२१/३९२ दि.१५/०९/२०२१.
३. महाआयटी यांचा कालावधी भरण्यास दिलेल्या पर्यायाबाबत दि. १४/११/२०२२ रोजीचा ईमेल संदेश.

सन २०१८-१९ पासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांकरिता बनविण्यात आलेल्या **महाडीबीटी पोर्टलद्वारे** ( संकेतस्थळ - www.mahadbtmahait.gov.in ) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येत असलेल्या **डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांतर्गत**, योजनेच्या अटी शर्तीनुसार डीबीटी पोर्टलवर देयक जनरेट करण्यासाठी १० महिन्याच्या कालावधीसाठी अलॉटमेंट करण्यात येते.

परंतु सन २०२०-२१ मध्ये कोविड-१९ साथीच्या रोगाच्या अनुषंगाने राज्यात लागू केलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत खरोखरच वसतीगृहांचा वापर झाला आहे काय याची खात्री करण्यासाठी शासनाकडून संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे शासन आदेशानुसार, विभागीय कार्यालयांना संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये सूचित करुन, त्यांच्याकडून सदर कालावधीमध्ये उपरोक्त योजनेंतर्गत डीबीटी पोर्टलवर मंजूर करण्यात आलेले विद्यार्थी शिक्षणासाठी वसतिगृह किंवा अन्य ठिकाणी संबंधित वर्षासाठी राहत होते किंवा कसे ? याबाबतची शहानिशा करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले.

या अनुषंगाने, विभागीय कार्यालयांनी सादर केलेल्या अहवालानुसार, असे निदर्शनास आले की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये सदर योजनेंतर्गत पात्र ठरविण्यात आलेले बरेच विद्यार्थी १० महिन्यांच्या संपूर्ण कालावधीसाठी वसतीगृहात / पेईंग गेस्ट म्हणून प्रत्यक्ष वास्तव्यास नव्हते.

सदरची बाब शासनास निदर्शनास आणून दिल्यानंतर, पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीनुसार निर्वाह भत्ता अदा करण्यासाठी निर्देश देण्यात आले. परंतु डीबीटी पोर्टलवर प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी ( महिन्यामध्ये ) नमूद करण्याचा पर्याय उपलब्ध नसल्याने, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीनुसार निर्वाह भत्ता अदा करण्यासाठी, सदर योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधी ( महिन्यानुसार ) ची माहिती भरण्यासाठीचा पर्याय संस्थेच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले व प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीनुसार ( महिन्यानुसार ) लाभाच्या रकमेचे अलॉटमेंट करुन देण्याबाबत कळविण्यात आले.

तरी या अनुषंगाने, संदर्भ क्र.३ नुसार, महाआयटीकडून डीबीटी पोर्टलवर शै.वर्ष २०२०-२१ पासूनच्या विद्यार्थ्यांसाठी डीबीटी पोर्टलवर संस्थांच्या लॉगीनमध्ये, सदर योजनांतर्गत वर्षनिहाय प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीनुसार ( महिन्यानुसार ) निर्वाह भत्याची रक्कमेची गणना करुन अलॉटमेंट करण्याच्या दृष्टीने प्रत्येक विद्यार्थ्याचा प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी महिन्यांमध्ये नमूद करण्यासाठीचा पर्याय (Option) खालीलप्रमाणे सूचनासह उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच याबाबतची **Standard Operating Procedure ( SOP )** सोबत जोडलेली आहे. तसेच सदरचा SOP संस्था, विभागीय कार्यालयाच्या लॉगीनमध्ये देखील उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे, त्याचे अवलोकन करावे.

- **डीबीटी पोर्टलवर सदर योजनांतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी महिन्यांमध्ये नमूद करण्यासाठीच्या पर्यायासोबत (Option) संस्थेच्या लॉगीनमध्ये खालील सूचना देखील देण्यात आलेल्या आहेत.**

- Select how many months the Student Reside in Hostel/ As a Paying Guest from Drop down list for the academic year-2020-21.
- And after filling the month the Allotted Amount will be calculated as per actual months filled by institute and it can't be change at any level. Hence fill the actual month of student reside in Hostel / As a Paying Guest carefully.
- Institute has to inform students also "about how many months the institute has filled".
- No.of Actual Month Stay in Hostel / as a Paying Guest ( Count of number of month should be From the start of academic year till the End of academic year )
  Example –
  1. If Actual Month of Stay in Hostel / as a Paying Guest is 4 Month than Select 4 Month and not 10 month.
  2. If start of Academic year is October 2021 and End of Academic year is June 2022 than Actual Month of Stay in Hostel / as a Paying Guest should not be more than 9 Month as Academic classes is for 9 Months only.

**For Dr Punjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna (DTE) 20 - 21 Pending Application List for Hostel Month Click Here**

तरी विभागीय कार्यालयांनी, त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संबंधित संस्थांना, सदर योजनांतर्गत प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीनुसार ( महिन्यानुसार ) निर्वाह भत्याच्या रक्कमेची गणना करुन अलॉटमेंट होणार असल्याने, संस्था स्तरांवर प्राप्त व मंजूर करण्यात येत असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी ( महिन्यामध्ये ) भरण्यासाठी खालीलप्रमाणे वर्षनिहाय देण्यात आलेल्या सूचनांनुसार **कार्यवाही तात्काळ ८ दिवसाच्या आत पुर्ण करण्याबाबत सूचना द्याव्यात व त्याबाबत दूरदृष्य प्रणालीद्वारे देखील बैठक घेऊन सूचित करावे.**

**१. शै.वर्ष २०२०-२१ च्या सदर योजनांतर्गत मंजूर व देयक जनरेट करण्यासाठी अलॉटमेंट झालेल्या परंतु निर्वाह भत्ता अदा करण्यासाठी देयक ( Bill ) जनरेट न केलेल्या तसेच संस्था स्तरांवर प्रलंबित विद्यार्थ्यांच्या अर्जासाठी...**

- डीबीटी पोर्टलवर प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी ( महिन्यामध्ये )नमूद करण्याचा पर्याय उपलब्ध नसल्याने, प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधीनुसार ( महिन्यामध्ये ) लाभाची गणना करण्यासाठी अलॉटमेंट न झालेल्या अशा सर्व संबंधित **विद्यार्थ्यांची यादी** महाआयटीकडून संबंधित संस्थेच्या क्लार्कच्या लॉगीनमध्ये स्क्रुटीनी अंतर्गत **" For Dr Punjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna (DTE) 20 - 21 Pending Application List for Hostel Month"** या नावाने विद्यार्थ्यांच्या अर्जातील संपूर्ण तपशीलासह उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

- क्लार्क लॉगीनमध्ये उपलब्ध करुन दिलेल्या यादीतील विद्यार्थ्यांचा वसतीगृह किंवा अन्य ठिकाणी संबंधित वर्षासाठी प्रत्यक्षात किती कालावधी/महिन्यासाठी राहात होते किंवा कसे ? त्याबाबतची संस्थेने शहानिशा करुन त्याप्रमाणे प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीनुसार, पोर्टलवर देण्यात आलेल्या Dropdown list अंतर्गत उपलब्ध १ ते १० महिन्यांपैकी अचूक कालावधी ( महिन्यामध्ये ) निवड करून पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे. (उदा.जर विद्यार्थ्याचा प्रत्यक्ष वास्तव्याचा

कालावधी ७ महिने असेल तर ७ ची निवड करावी. ) जेणेकरुन सन २०२०-२१ साठी संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी ( महिन्यामध्ये ) नुसार निर्वाह भत्याची रक्कमेची गणना करुन अलॉटमेंट करण्यात येईल व त्यानुसार मंजूर रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

- सदरची कार्यवाही डीबीटी पोर्टलवर ऑनलाईनरित्या फक्त क्लार्कच्या लॉगीनमधून होत असल्या कारणाने संबंधित संस्थांच्या प्राचार्यांनी माहिती अचूक भरण्यात येईल याबाबतची दक्षता घ्यावी. प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी हा चूकीचा भरण्यात आल्याचे आढळून आल्यास, त्याबाबतची जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

२. **शै.वर्ष २०२१-२२ च्या सदर योजनांतर्गत या आधी संस्था स्तरांवर मंजूर /प्रलंबित विद्यार्थ्यांच्या अर्जांसाठी-**

- सदर योजनांतर्गत याआधी संस्था स्तरांवर मंजूर करण्यात आलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज महाआयटी कडून प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी ( महिन्यामध्ये ) नमूद करण्यासाठीच्या पर्यायासह संबंधित संस्थेच्या क्लार्कच्या लॉगीनमध्ये स्क्रुटीनी अंतर्गत परत पाठविण्यात आलेले आहेत.तरी संस्था स्तरांवर उपलब्ध झालेल्या प्रलंबित असलेल्या अर्जांची संस्थांनी, क्लार्कच्या लॉगीन मधून विद्यार्थ्यांच्या अर्जांची संपूर्ण तपासणी करुन,डीबीटी पोर्टलच्या कार्यपध्दती(वर्कफ्लो ) नुसार मंजूर/ नामंजूर करावे किंवा जर अर्जामध्ये चूक असेल तर विद्यार्थ्यांना परत पाठवून चूक दुरुस्त करुन घ्यावी. तसेच, मंजूर करण्यात येत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये, प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीची शहानिशा करुन, प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी ( महिन्यामध्ये ) नमूद करुन तपासणीसाठी प्राचार्यांच्या लॉगीनमध्ये पाठवावे.

- तसेच क्लार्क स्तरांवर मंजूर झालेले अर्ज, प्राचार्यांनी त्यांच्या लॉगीन आयडीचा वापर करुन, विद्यार्थ्यांच्या अर्जांची संपूर्ण तपासणी करुन,डीबीटी पोर्टलच्या कार्यपध्दती (वर्कफ्लो ) नुसार मंजूर/ नामंजूर करावे किंवा जर अर्जामध्ये चूक असेल तर क्लार्कच्या लॉगीनमध्ये दुरुस्तीसाठी परत पाठवावे. तसेच, मंजूर करण्यात येत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीची शहानिशा करुन प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी ( महिन्यामध्ये ) नमूद करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे. प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी हा चूकीचा भरण्यात आल्याचे आढळून आल्यास, त्याबाबतची जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

- संबंधित योजनेंतर्गत नमूद व मंजूर करण्यात आलेला विद्यार्थ्याचा प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी ( महिन्यामध्ये ) नुसार निर्वाह भत्याची रक्कमेची गणना करुन अलॉटमेंट करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

- तसेच, डीबीटी पोर्टलवर मागील वर्षाच्या तपासणीसाठी प्रलंबित असलेल्या अर्जाच्या विद्यार्थ्यांना नवीन वर्षाचे अर्ज भरता येत नाही त्या कारणाने मागील वर्षाचे (२०२०-२१ व २०२१-२२) अर्ज संस्थांनी ८ दिवसांच्या आत निकाली काढावेत व संस्थांकडून डीबीटी पोर्टलवर नमूद केलेला प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी ( महिन्यामध्ये ) हा विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

- **तसेच, विभागीय कार्यालयांनी, सन २०२०-२१ साठी** संस्थेच्या क्लार्कच्या लॉगीनमध्ये उपलब्ध झालेली यादीमध्ये असलेल्या **मंजूर विद्यार्थ्यांचा** क्लार्क स्तरांवरुन विद्यार्थ्याचा प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी ( महिन्यामध्ये ) नमूद केल्यानंतर सरळ निर्वाह भत्याच्या रक्कमेची गणना करुन अलॉटमेंट होणार असल्याने, सर्व संबंधित विभागीय कार्यालयांनी, सन २०२०-२१ साठी विभागीय कार्यालयाकडून डीबीटी पोर्टलवर मंजूर करण्यात आलेले विद्यार्थी शिक्षणासाठी वसतिगृह किंवा अन्य ठिकाणी संबंधित वर्षासाठी राहत होते किंवा कसे ? याबाबतची करण्यात आलेल्या शहानिशाअंती निदर्शनास आलेल्या विद्यार्थ्याचा प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीपेक्षा संस्थाकडून जास्त कालावधी नमूद केला जाणार नाही याबाबतची संस्थांना सूचना द्यावी व विभागीय कार्यालयांनी त्याबाबतची दक्षता घ्यावी.

- **तसेच, विभागीय कार्यालयांनी,** त्यांच्या लॉगीनमध्ये, प्राप्त होणाऱ्या संस्था स्तरांवर मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज डीबीटी पोर्टलच्या कार्यपध्दती (वर्कफ्लो ) नुसार मंजूर/ नामंजूर करावे. तसेच, मंजूर करण्यात येत असलेल्या पात्र

विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये संस्थेकडून नमूद करण्यात आलेल्या प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधीची शहानिशा करुन अर्ज मंजूर करावे आणि जर प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधी जास्त आढळून आला तर प्रत्यक्ष वास्तव्याच्या कालावधी दुरुस्त करण्यासाठी अर्जामध्ये कारण नमूद करून संस्थेच्या प्राचार्यांच्या लॉगीनमध्ये परत पाठवून सूचित करावे. जेणेकरुन मंजूर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी ( महिन्यामध्ये ) नुसार निर्वाह भत्याची रक्कम लवकरांत लवकर अदा करता येईल.

- महाआयटी कडून प्रत्यक्ष वास्तव्याचा कालावधी ( महिन्यात ) नमूद करण्यासाठीच्या पर्यायासह संबंधित संस्थेच्या क्लार्कच्या लॉगीनमध्ये स्क्रुटीनी अंतर्गत परत पाठविण्यात आलेल्या विभागीय कार्यालय व वर्ष निहाय विद्यार्थी अर्जांची संख्या खालीलप्रमाणे असून, सदर विद्यार्थ्यांची यादी ईमेलद्वारे माहितीसाठी पाठविण्यात आलेली आहे.

| Sr.No. | Region | 2020-2021 | 2021-2022 | Grand Total |
|---|---|---|---|---|
| 1 | Amravati | 256 | 839 | **1095** |
| 2 | Aurangabad | 7171 | 13785 | **20956** |
| 3 | Mumbai | 675 | 1110 | **1785** |
| 4 | Nagpur | 228 | 626 | **854** |
| 5 | Nashik | 3174 | 5099 | **8273** |
| 6 | Pune | 19657 | 33287 | **52944** |
| | **Grand Total** | **31161** | **54746** | **85907** |

(डॉ. अभय वाघ.)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

प्रत — मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/MahaDBT/निर्वाह भत्ता /२२/3712 दिनांक :- 28 NOV 2022

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय,अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदविका संस्था, नागपूर विभाग,
नागपूर .

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक **वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मधील डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनांतर्गत** आपल्या लॉगीन ला प्रलंबित असलेले विद्यार्थ्यांचे अर्ज संदर्भिय पत्रात दिलेल्या **निर्देशानुसार कार्यवाही करून तात्काळ सदर अर्ज मंजूरीस्त्व पाठविण्यात यावे.**

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

# Dr. Punjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna

( Reference Document for scrutiny to insert no of months )


## For – 2020 – Dr. Panjabrao Deshmukh Scheme

1. **For those applications where allotment is done but bill not generated**


   - **All such application's allotment will be reverse and status will be scrutiny complete.**
   - **Respective institute clerk will enter "No of months" with the help of tab provided in clerk login**

     **Please find below screen shot for reference**

     **1. In institute scrutiny – "For Dr. Panjabrao 20-21 Pending Application List for Hostel Month"** tab is given to insert actual No of months. On click




   - **After entering the value, application will be available to insert 'No of months' with application list**





***** After inserting No. of months applications will be available for allotment and after allotment applications will be available for bill generation in DDO login.**

2. **For those applications where scrutiny process is going on**

   - **All such applications will be reverted to respective institute clerk level**
   - **Institute clerk will enter "No of months" while doing scrutiny.**

     **Please find below screen shot**





- **Further scrutiny will be as per defined work flow.**

## For – 2021 – Dr. Panjabrao Deshmukh Scheme

- All such applications will be reverted to respective institute clerk level
- Institute clerk will enter "No of months" while doing scrutiny.

  Please find below screen shot for reference –




- Further scrutiny will be as per defined work flow.